**ठळक बातम्या**

- अधिक व्याजदराचं आमिष दाखवणाऱ्या फसव्या योजनांच्या तपासणीसाठी पोलिसांची विशेष मोहीम, बीड लैंगिक अत्याचार प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- नव्या पीक योजनेंतर्गत दोषी ठरलेल्या विमा कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याचं कृषीमंत्र्यांचं आश्वासन

- केंद्र सरकारकडून रोजगार निर्मितीला चालना देणाऱ्या सवलत योजनेची घोषणा, नव्या क्रीडा धोरणालाही केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड

**आणि**

- मालवाहतूकदार आणि स्कूल बस चालकांचा मध्यरात्रीपासून संपाचा इशारा

**<><><><>**

राज्यात अधिक व्याजदराचं आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबवण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केलं. नागरिकांनी गुंतवणूक करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक परवाने, नोंदणी आणि अधिकृत मंजुरी याची खातरजमा करावी, असं ते म्हणाले.

बीड इथल्या अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी अर्थात विशेष तपास पथक स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केली.

मुंब्रा इथं अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार आणि तिची निर्घृण हत्या ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या गुन्ह्याचा तपास जलदगतीने पूर्ण करून

पीडितेला न्याय मिळावा, यासाठी हे प्रकरण  जलद गती  न्यायालयात चालवण्यात येईल, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

विधानसभा अध्यक्षांच्या आसनाकडे धावून जात राजदंडाला स्पर्श केल्याप्रकरणी काँग्रेस सदस्य नाना पटोले यांना आज दिवसभरासाठी सभागृहातून निलंबित करण्यात आलं. या निर्णयावर नाराजी व्यक्त करत विरोधकांनी दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला.

**<><><><>**

राज्य शासनाच्या नव्या पीक योजनेंतर्गत दोषी ठरलेल्या विमा कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि अशा कंपन्यांना शासनाकडून ब्लॅकलिस्ट करण्यात येईल अशी माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत दिली. पीक विमा कंपन्यांना होणाऱ्या नफ्याविषयी अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

राज्यात यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या असून पंचनामे पूर्ण होताच धोरणानुसार मदतीचं वाटप करण्यात येईल, अशी महिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

अन्नपदार्थांची घरपोच सेवा देत असलेल्या, ई-कॉमर्स आस्थापनांच्या गोदामांची अन्नसुरक्षा मानके कायदा २००६, च्या नियमानुसार, सखोल तपासणी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत अशी माहिती अन्न आणि  औषध मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. स्विगी, झोमॅटो, झेप्टो इत्यादी आस्थापनांच्या गोदामांची दर सहा महिन्यांनी तपासणी केली जाईल, अशा गोदामांवर २७ मोबाईल वॅन द्वारे लक्ष  ठेवलं जाईल, असं त्यांनी यासंदर्भातल्या लक्षवेधीला उत्तर देताना सांगितलं.

राज्य सरकारच्या वाळू धोरणाअंतर्गत स्थानिक तहसीलदारावर आणि तलाठी यांना घरकुलांना वाळू उपलब्ध करण्याची जबाबदारी निश्चित केल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. स्थानिक घरकुलांना वाळू उपलब्ध होत नसल्याची तक्रार दादाराव केचे यांनी केली होती. त्यावर अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करण्याचं आश्वासन

त्यांनी दिलं. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग - २०२५, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग -२०२५ ही विधेयकं विधानपरिषदेत मांडण्यात आली.

**<><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज रोजगाराशी संलग्न सवलत योजनेला मंजुरी दिली. या अंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणाऱ्यांना १५ हजार रुपयांपर्यंतची रक्कम मिळेल. १ कोटी ९२ लाख युवकांना याचा लाभ मिळेल अशी आशा माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याविषयी माहिती देताना व्यक्त केली. त्यांना कामावर ठेवणाऱ्या कंपन्यांना दरमहा ३ हजार रुपये या प्रमाणे २ वर्ष मदत मिळेल. उत्पादन क्षेत्रातल्या कंपन्यांना आणखी दोन वर्षांसाठी हे अनुदान मिळेल. यामुळं अडीच कोटींहून अधिक रोजगार निर्माण होण्याची आशा वैष्णव यांनी व्यक्त केली.

केंद्रीय मंत्रिमंडळानं एक लाख कोटी रुपयांच्या निधीसह संशोधन विकास आणि नवोन्मेष योजनेलाही मंजुरी दिली. याशिवाय राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ला देखील आज केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- होल्ड व्हाइस कास्ट-**

*ट्रेनिंग, कोचिंग आणि खेळाडूंना सर्वांगीण पाठबळ यासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उभारणं हे या धोरणाचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. नव्या क्रीडा धोरणात लहान वयातल्या प्रतिभावान खेळाडूंना शोधून त्यांच्या गुणवत्तेला आकार देण्यासाठी काम केलं जाईल. ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास करणं तसंच स्पर्धात्मक लीग आणि स्पर्धा सुरू करण्यावर या धोरणाचा भर आहे. महिला, आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग, आदिवासी आणि दिव्यांगांचा सहभाग वाढवण्यासाठी उपक्रम सुरू केले जाणार आहेत. देशी आणि पारंपरिक खेळांना नवसंजीवनी देत क्रीडा क्षेत्रात करिअरच्या संधी निर्माण करण्याला चालना दिली जाईल. या अंतर्गत शाळा, महाविद्यालयं आणि कामाच्या ठिकाणी तंदुरुस्ती निर्देशांक लागू करण्यात येणार आहे.*

**<><><><>**

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची आज बिनविरोध निवड झाली. मुंबईतल्या वरळीत झालेल्या प्रदेश अधिवेशनात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी ही

घोषणा केली. या घोषणेनंतर मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून रविंद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतली. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

पक्षाचा एक कार्यकर्ता महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचू शकतो, ही संघटनेची ताकद आहे. ही ताकद भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला देण्यासाठी प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली.

**<><><>**

राज्य सरकारनं हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेतल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संयुक्तपणे विजयी मेळावा घेणार आहेत. दोन्ही पक्षांनी आपल्या अधिकृत समाज माध्यमावर याविषयी माहिती दिली आहे. मुंबईत वरळी इथं येत्या शनिवारी आयेजित या विजयी मेळाव्याला राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत.

**<><><>**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दादर इथल्या स्मारकाशी संबंधित याचिका आज मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळल्या. शिवाजी महाराज पार्क परिसरातला महापौर बंगला १ रुपयाच्या नाममात्र रकमेत या स्मारकासाठी देण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या जनहित याचिका दाखल झाल्या होत्या.

**<><><>**

महाराष्ट्र राज्य ट्रक, टेम्पो, टँकर्स, बस वाहतूक संघाच्या नेतृत्वाखाली वाहतूकदार संघटनांनी आज मध्यरात्रीपासून बंद पुकारला आहे. शाळा बस मालक संघटनेनंही उद्यापासून संपावर जात असल्याचं जाहीर केलं आहे.

परिवहन विभाग आणि पोलिसांकडून सुरू असलेल्या अकारण अडवणुकीविरोधात हा संप पुकारत असल्याचं वाहतूकदार संघटनांनी जाहीर केलं आहे.

**<><><>**

आषाढी वारीसाठी येण्याऱ्या वारकऱ्यांचा वारीदरम्यान मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसदारांना मदत देण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. या शासन निर्णयानुसार अपघातानं अथवा दुर्घटनेत मृत्यू झाल्यास मृतांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपयांची मदत मिळणार आहे. तसंच वारी दरम्यान ४० ते ६० टक्के अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ७४

हजार तर ६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास अडीच लाख रुपयांची मदत मिळणार आहे.

**<><><><>**

शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी राज्यात आज ठिकठिकाणी आंदोलन झालं. कोल्हापुरात शिरोली जवळच्या पंचगंगा नदी पुलावर शेतकऱ्यांनी चक्काजाम केला. यावेळी जलसमाधी घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांनी पोलिसांनी अडवलं.

**परभणी** जिल्ह्यातल्या ३१ गावातल्या शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं या निर्णयाविरोधात आज रास्तारोको आंदोलन केलं.

यामुद्द्यावरुन **हिंगोली** जिल्ह्यातल्या भाटेगाव इथं महामार्ग विरोधी कृती समितीनं रास्ता रोको आंदोलन केलं. शेतकऱ्यांनी जवळपास एक तास हा मार्ग अडवल्यानं दुतर्फा वाहनांची मोठी रांग लागली होती.

**<><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची, तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची तर उत्तर किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची तर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**//<><><><>//**